Hon. court

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण  **P.S.(ठाणे):** बारामती
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0190  **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/05/2025 14:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 18/03/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/03/2025
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 23:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 14/05/2025  **Time (वेळ):** 14:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 026
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/05/2025 14:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.5 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पो स्टे समोरील फुटपाथ रोडवर, बारामती तालुका पोलिस स्टेशन ,ता बारामती जि पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री शुभम पंडीत रणदीवे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1999

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामवाडी ता करमाळा जि सोलापुर,करमाळा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रामवाडी ता करमाळा जि सोलापुर,करमाळा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7218122696

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल माणिक जगताप | | | 1. कालठण ता इंदापुर जि पुणे, इंदापूर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रविण भाऊसाहेब भोसले | | | 1. बारामती ता बारामती जि पुणे , बारामती,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्कवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद तारीख 14/5/2025

मी श्री शुभम पंडीत रणदीवे वय-२६ वर्ष व्यवसाय शेती रा. रामवाडी ता करमाळा जि सोलापुर मो न 7218122696

समक्ष हजर राहुन जबाब देतो की, मी दि 17/3/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे फोन द्वारे संपर्क करुन पोलीस उप अधिक्षक श्री गावडे याना माझी लाच मागणी विषय तक्रार असल्याचे कळविले त्यांनी मला पोलीस निरीक्षक निंबाळकर हे संपर्क करतील असे कळविले त्यानंतर पोलीस निरीक्षक निबाळकर यानी मला फोन द्वारे संपर्क केला व लाच मागणीची लेखी तकार देणेबाबत विचारणा केली असता मी दि. 18/3/2025 रोजी लाच मागणी होत असलेबाबत लेखी तक्रार देतो त्यासाठी आपण बारामती येथे या असे सांगितले.

दि 18/3/2025 रोजी पोलीस निरीक्षक निबाळकर, लाप्रवि पुणे यानी माला संपर्क केला असता मी त्यांना एम आय डी सी बारामती येथील फेरेरो कपनी जवळ येण्यास सागितले त्यानुसार पोलिस निरीक्षक निबाळकर, सापळा पथक व दोन पच असे एम आय डी.सी बारामती येथील फेरेरो कपनी जवळ आले. सदर वेळी पोलीस निरीक्षक निंबाळकर यानी त्यांची, सापळा पथक व पच आतिष केरु शिंदे कनिष्ठ सहायक जिल्हा परिषद पुणे व श्री. विजय रामचंद्र बागुल पद-कनिष्ठ सहायक जिल्हा परिषद पुणे यांची ओळख करुन दिली. त्यानतर पोलीस निरीक्षक निबाळकर यांनी मला माझे नाव विचारुन मला लेखी तक्रार देणेबाबत सांगितले त्यानुसार मी लेखी तक्रार दिली व ती पुढीलप्रमाणे "मी. श्री. शुभम पडीत रणदीवे वय 26 वर्ष व्यवसाय-शेती रा. रामवाडी ता. करमाळा जि. सोलापुर असुन सदर ठिकाणी मी माझे कुटुबासह राहणेस असुन माझे वडीलोपार्जीत शेतीवर उपजीविका करतो. मी दि. 11/3/2025 रोजी माझ्या ताब्यातील चारचाकी गाडी फोर्ड फिएस्टा त्याचा नबर MH 02 BM 6901 गाडी घेऊन बारामती सिटी इन चौकातून जात असताना अमरदीप हॉटेल जवळ किरकोळ अपघात झाला होता. अपघातानन्तर काही वेळाने पोलीस आले व मला औषधोपचार करुन बारामती तालुका पोलीस स्टेशनला घेऊन गेले. त्यावेळी सदर बारामती तालुका पोलीस स्टेशन येथ उपस्थित असलेले जगताप पोलीस व भोसले पोलीस यानी सदर अपघाताचा गुन्हा दाखल न करणेसाठी व माझी गाडी सोडवणेसाठी माझ्याकडे 30,000/- हजार रुपयाची मागणी केली होती. मी त्याना माझी परीस्थिती नाही असे सागुन परत आलो होतो. जगताप पोलीस व भोसले पोलीस यानी मागितलेली रक्कम ही लाच असुन ती देण्याची माझी इच्छा नाही. त्याच्यात व माझ्यात कोणताही आर्थिक व्यवहार नाही. तसेच भाडण वैर नाही. मी दिलेल्या तक्रारीवरुन कारवाई होण्यास विनती आहे.

मी माझी लेखी तक्रार पंचासमक्ष वाचुन दाखवली सदरची तक्रार माझे हकिकते प्रमाणे बरोबर असल्याची खात्री करुन माझी लेखी तक्रारीवर पोलीस निरीक्षक निंबाळकर यानी व पच साक्षीदार थानी वाचून त्यावर सहया केल्या

मी दिलेल्या तक्रारीनुसार दि. 18/3/2025 रोजी जगताप पोलीस व भोसले पोलीस याची माझेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत पडताळणी करणेचे ठरले त्याकरीता सॅनडीस्क कपनीचे नवीन सिलबद मेमरीकार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढून पंचासमक्ष शासकिय व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. त्यानतर माझे व पच क्र.1 आतिष केरु शिदे यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 13/57 वा ची होती. त्यानतर पोलीस निरीक्षक निबाळकर यांनी मला व पच क्र.1 शिदे याना दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी केली व व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो मी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस असलेल्या बनियानला चालु करुन लावुन दिला व पंच क्र.1 श्री. शिंदे यांचे सोबत माझे हिरो कपनीची दुचाकी तिचा नंबर MH 11 CM 3428 या दुचाकी वाहनाने पडताळणीकामी बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे 14/06 वाजता पाठवले असता सदर पडताळणीवेळी मी व पच क्र.1 शिदे असे बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे जात असताना पोलीस स्टेशन बाहेरील रोडवर फुटपाथवर श्री भोसले पोलीस हे थाबले होते त्यांनी मला आवाज देऊन बोलावुन घेतले. सदर ठिकाणी श्री भोसले व माझेत माझ्या कामासंदर्भात चर्चा झाली सदर चर्चेदरम्यान भोसले हे मला म्हणाले की, " काय करायचे तुझे माझ्यापाशी एक मिनीटाच काम

आहे... तु लवकर उरकल तर हजार वेळा येतो... माझ्याकड पैशाच। विषय काहीच नाही... जगताप सरांकडे सगळ आहे... अवाच्या सव्या काहीच सांगितल नाही... जेवढा त्याच्यात खर्चयना तेवढाच तुला अटक नाय फिटक नाय म्हणल्याव तेवढा खर्च येणारच ना? गाडी प्रेमातच सोडायची ना तू जगताप मामाला फोन कर.. पैसे नाही देत म्हणल्यावर माणस अडकवतात माझ सोड तु जगताप मामाला विचार ... माझ काहीच नाही मी कागद करणार बर तु दरवेळेस येतोय तुझ्या तोंडान तुच बोलुन गेलाय एवड एवढ देतो तेवढयातच तुम्हाला कराव लागेल तुझ्याच तोंडान बोलुन गेलाय मी काय आडव बोललो. त्या दिवशी पण लगेच सोडलच होत की तुला "असे बोलले त्यावर मी श्री भोसले यांना म्हणालो "पप्पांना वाटल थोडक्यात होईल दोन पाच मध्ये पण लयच हे झाल. "त्यावर भोसले "आता राहीलाय का र दोन पाच चा जमाना "झेरॉक्स काडाय हा गुन्हा नेला तर ना झेरॉक्स चे तीन चार हजार होतात नको नको होतय माहितय का? अन तु म्हणतोय दोन न पाच" असे बोलले त्यावर मी त्यांना "किती करायच असे विचारल असता "नाय तु गेल्यावेळेस म्हणलाय ना तेवढच करायच जगताप साहेबांना बोल "त्यानतर मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत गेलो ती वेळ 14/35 वा ची होती त्यानतरः पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी मला जगताप पोलीस यांची भेट का घेतली नाही असे विचारले असता जगताप पोलीस हे जेवण करणेसाठी गेल्यामुळे भेट घेतली नसल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक निबाळकर यांनी जगताप पोलीस यांची भेट घेणेकामी व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो मी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस असलेल्या बनियानला चालु करुन लावुन व पंच क्र.1 श्री. शिंदे याचे सोबत 15/55 वा रवाना केले. सदर पडताळणी दरम्यान मी व पंच क्र.1 असे बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गेला तेथे जगताप पोलीस हे उपस्थित नव्हते. त्यावेळी मी माझा मोबाईल क्रमाक 7218122696 वरुन जगताप पोलीस यांचा मोबाईल क्र.9552594260 वर फोन करुन "कुठ हाय? मी पोलीस स्टेशन च्या बाहेर आहे" असे विचारले असता "रुमवर ए, पाच सहा वाजता फोन करतो तुला" असे बोलले त्यामुळे मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 16/17 वा परत आलो.

त्यानंतर माझा मोबाईल क्र. 7218122696 वर जगताप पोलीस यांचा मोबाईल क 9552594260 वरुन कॉल येत असले बाबत मी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना सांगितले सदर कॉल व्हाईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड करण्याचे सर्वानुमते ठरल्याने त्यानंतर 16/27 वा व्हॉईस रेकॉर्डर चालु केला व मी माझा मोबाईल क्रमांक 7218122696 वरुन जगताप पोलीस यांचे मोबाईल क्रमांक क्र.9552594260 वर फोन केला व स्पिकरवर टाकला सदर फोन वरील संभाषणा दरम्यान जगताप पोलीस यांनी मला गाडीचे इन्श्युरन्स पेपर बद्दल विचारणा करुन सदर पेपर घेऊन येणेबाबत सांगितले त्यावर मी जगताप पोलीस यांना उदया इन्श्युरन्स पेपर घेऊन येतो असे सांगितले त्यावर जगताप पोलीस यांनी वर असे म्हणून रात्री फोन करतो असे म्हणून फोन कट केला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी मला पुढील पडताळणी कारवाई बाबत विचारणा केली असता मला गाडीचे इन्श्युरन्स पेपर घेऊन येणेस जगताप पोलीस यांनी सांगितलेने मी दि.18/03/2025 मी रोजी पडताळणी कारवाई स्थगित करण्यास सागुन दि.19/03/2025 रोजी पडताळणी कारवाई करण्याची विनंती केलेने दि. 18/3/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात येऊन पुढील कारवाई दि.19/03/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानुसार दि.19/3/2025 रोजी पोलीस निरीक्षक निंबाळकर यानी माझे व पंच 1 श्री शिंदे यांचे पडताळणी निवेदन ध्वनिमुद्रीत केले ती वेळ 12/13 वा ची होती. त्यानंतर मला व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो मी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस असलेल्या बनियानला सेफ्टी पिनच्या सहायाने लावून दिला व पडताळणीकामी बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे 12/20 वाजता रवाना केले मी व पंच क्र 1 शिदे असे बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे जात असताना पोलीस स्टेशन बाहेरील रोडबर फुटपातवर श्री. भोसले हे थांबले होते त्यांचेकडे जाऊन मी त्यांची भेट घेऊन मी भोसले साहेब यांना आलेतका साहेब ? असे विचारले असता त्यांनी ते आता नाईट करुन घरी गेलेत. ते आता आज एवढ्यासाठी नाय येणार ते उद्या बारा वाजता या, फोन करून या पण आणि येताना गाडीचे इन्श्युरन्सचे पेपरचे झेरॉक्स आना, संपलेला का असेना पण झेरॉक्स आना" असे मला म्हणाले सदरचे संभाषणावेळी पंच शिंदे उपस्थित होते व सदरचे संभाषण पंच शिंदे यानी ऐकले आहे त्यानंतर मी सापळा पथक थांबलेल्या विकाणी 12/45 वा परत आलो त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी मला पुढील कारवाई बाबत विचारणा करता मी सांगितले की, आज जगताप पोलीस यानी भेट होणार नाही आणि भोसले पोलीस यांनी मला उदया इन्शुरन्सचे पेपर घेऊन बोलावले आहे त्यामुळे आज रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करुन दि. 20/3/2025 रोजी पुढील कारवाई करु असे सांगितलेने दि. 19/3/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली होती. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दि 20/3/2025 रोजी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी मला पडताळणीसाठी जाणे रांदर्भात विचारले अराता मी सांगितले की, भोसले पोलीस यानी जगताप यांना फोन करून येणेबाबत सांगितले असुन मी

पडताळणीकामी जाणेपुर्वी जगताप पोलीस यांना फोन करतो त्यामुळे माझे मोबाईल क्रमाक 7218122696 वरुन जगताप यांचे मोबाईल क्रमाक 9552594260 वर फोन करुन तो लाऊड स्पिकरवर टाकला सदर फोन संभाषण दरम्यान मी जगताप पोलीस यांना "मी येत आहे तुम्ही आलेत का आज ?" असे विचारले असता जगताप पोलीस यांनी आहे, ये असे सांगितले ती वेळ 10/42 वा ची होती.

जगताप पोलीस यांनी भेटण्यास बोलावलेची खात्री झालेने मला जगताप पोलीस व भोसले पोलीस यांचेकडे पडताळणी कामी पाठविणेचे ठरले. पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी केली. थोड्या वेळात माझे मोबाईल क्र. 7218122696 वर जगताप याचे मोबाईल कमांक 9552594260 वरुन फोन येत असल्याचे मी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना सांगितले ती वेळ 11/14 वा ची होती. सदर फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डर पर ध्वनीमुद्रीत करण्यात आला. सदर संभाषणा दरम्यान जगताप पोलीस मला "बर आज येवू नको," असे बोलले असता मी "आहो आलोय की साहेब आता टोलनाक्याच्या आलीकड आहे" असे बोललो. त्यावर जगताप पोलीस "पुण्याला चाललोय मी बॉस बरोबर, मी फोन करतो तुला" असे बोलले.

त्यानंतर मला पुढील पडताळणी कारवाईसाठी जाणे बाबत विचारणा केली असता जगताप पोलीस पुण्याला चालले आहेत त्यामुळे त्यांची आज भेट होणार नाही जगताप पोलीस फोन करणार आहेत त्यांचा फोन आले नंतर मी आपणास संपर्क करेल तेव्हा आपण पुढील कारवाई करु असे सांगितले. त्यामुळे दि.20/3/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दि.24/3/2025 रोजी पुढील कारवाई करणेबाबत मी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना संपर्क केला. मला पंच क्र.1 श्री. शिंदे यांचेसह जगताप पोलीस व भोसले पोलीस यांचेकडे पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले. त्यानंतर माझे व पंच क्र.1 श्री. शिंदे यांचे पडताळणी निवेदन ध्वनिमुद्रीत केले ती वेळ 13/59 वा ची होती. सदर वेळी मी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना सांगितले की सकाळी 11/00 वा चे सुमारास जगताप पोलीस यांचा त्यांचे मोबाईल क. 9552594260 वरुन मला फोन येऊन गेलेला आहे पण मी फोन रिसीव्ह केला नाही तरी मी त्यांची भेट घेणेस जाणेपुर्वी त्यांना फोन करुन ते आहेत का ते खात्री करतो व भेटण्यास येऊ का ते विचारतो त्यानंतर माझा मोबाईल क्रमांक 7218122696 वरून जगताप यांचे मोबाईल क्रमांक 9552594260 वर फोन करुन तो लाऊड स्पिकरवर टाकला सदर फोन संभाषण दरम्यान पोलीस जगताप यांनी मला 17/00 वाजता भेटण्यास बोलावले. सदर फोन कॉलची वेळ 14/06 वा ची होती. त्यानंतर 16/47 वा मला पंच क्र.1 शिंदे यांचेसह जगताप पोलीस यांची भेट घेणेसाठी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन मी परीधान केलेल्या बनियान च्या आतील बाजुस लावुन देऊन बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे माझे दुचाकी वरुन रवाना केले. मी पंच क्र.1 शिंदे यांचेसह बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे पडताळणीसाठी गेलो व जगताप यांची भेट घेतली. सदर चर्चेदरम्यान जगताप यानी मला "बोनाफाईड घेऊन ये नोटीस दयायचीय तुला गाडी सोडायची नाय का तुझी? असे बोलले त्यावर मी "किती काय करायच?" असे बोललो असता "पंधरा म्हणल नाय का तुला?" असे जगताप बोलले त्यावर मी "पंधरा हजार? असे विचारले असता ते "हं" असे म्हणाले. त्यावर मी "एवढं पंधरा हजार रुपये व्हय?" असे बोललो असता ते "मग किती ? असे म्हणाले. त्यावर मी "व्हंय... पाच एक हजार रुपयात करा असे बोललो. त्यावर ते "नाय नाय, जा जा चल. थांबु नको" असे म्हणाले त्यावर मी "आहो काय माझ लय अडचणी चालु आहेत साहेब आता, दहा मधी करा" असे म्हणालो. त्यावर ते "तुला अटक कराय लागलं. तुझ लायसन्स नाही त्यातुन "त्यावर मी "बर दहा एक हजार करून टाका साहेब कशाला उगाच आपल हे करताय... हं. "असे बोललो असता "ह करा" असे बोलुन जगताप पोलीस यांनी माझी गाडी सोडविणेसाठी व मला अटक न करणेसाठी माझेकडे 15 हजार रुपयाची लाच मागणी करुन तडजोडी अंती 10 हजार रुपयाची लाच रकमेची मागणी केली सदर लाच मागणी पचासमक्ष झाली असुन सदरचे संभाषण पंचानी ऐकले आहे. त्यानंतर मी व पंच सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो ती वेळ 17/22 वा ची होती.

त्यानंतर थोड्या वेळाने माझा मोबाईल क. 7218122696 वर जगताप पोलीस याचा सोबाईल क. 9552594260 वरुन फोन येत असलेबाबत मी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना सांगितले असता सदर फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड करण्याचे ठरवले व मी माझा फोन स्पिकरवर टाकला सदर संभाषण दरम्यान मी जगताप पोलीस यांना "माझ्या मुलाला ताप आला असून उदया सकाळी भेटायला येतो" असे सांगितले असता, जगताप पोलीस यांनी मला "बर" असे म्हणुन "एकटा ये" असे सांगितले तो वेळ 18/59 वा ची होती. त्यानंतर पुढील कारवाई बाबत पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी मला विचारणा केली असता सदर दिवशी माझेकडे लाच रक्कम उपलब्ध नसल्याने व माझा मुलगा आजारी असल्याने मी सापळा कारवाईसाठी जाऊ शकत नाही मी दि. 25/3/2025 लाच रक्कम घेऊन येतो त्यावेळी पुढील कारवाई करु अशी मी विनंती केलेने दि.24/3/2025 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दि.25/03/2025 रोजी जगताप पोलीस यांनी मागणी केलेली लाच रकमेची माझेकडे जुळवाजुळव झालेने मी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना संपर्क साधला असता त्यांनी लागलीच सापळा कारवाई करण्याचे ठरवले त्यानंतर माझे व पंच क्र.1 शिंदे यांचे सापळा निवेदन घेतले ती वेळ 10/55 या ची होती त्यानतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी मला दोन पंचासमक्ष जगताप पोलीस यांनी लाच मागणी केलेप्रमाणे 10,000/- लाच रक्कम हजर करण्यास सांगितले. त्यावेळी मी माझ्या बचतीमधुन 7,500/ रुपये 500 रुपये दराच्या 15 नोटा हजर केल्या. याव्यतिरिक्त माझेकडे लाच रक्कम नसलेबाबत मी सांगितलेने उर्वरीत 2500/- रुपये हे खेळण्यातील नकली नोटा वापरण्याचे सर्वानुमते ठरल्याने खेळण्यातील 5 नकली नोटा 500/- रुपये लिहीलेल्या लाच रकमेमध्ये समाविष्ट केल्या पोनि निंबाळकर यांचे सुचनेनुसार मपोहवा 7901 गोरे यांनी दोन्ही पंच व मला अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले व मी हजर केलेल्या 500 रुपये दराच्या भारतीय बलनातील 15 नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन त्या नोटांना तसेच नकली खेळण्यातील 05 नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लाऊन सदर नोटा मपोहवा गोरे यांनी माझे नेसत्या पॅन्टचे पुढील उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या व पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी योग्य त्या सुचना दिल्या व जगताप पोलीस यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर डोक्यावर हात मारुन लाच रक्कम स्विकारलेबाबत इशारा करावा असे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक यांनी सुचनांची उजळणी करुन व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो माझे शर्टचे आतील बनियानला कोणासही दिसणार नाही अशा स्थितीत लावुन दिला ती वेळ 11/26 वा. ची होती. त्यानंतर मी व पंच क्र.1 शिंदे माझे दुचाकीवर बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गेलो असता सदर ठिकाणी जगताप पोलीस उपस्थित नव्हते. त्यावेळी मी माझ्या मोबाईल क्रमाक 7218122696 वरुन जगताप 9552594260 पोलीस यांचे मोबाईल क्रमाकावर फोन केला असता जगताप पोलीस यांनी सांगितले की ते नाईट ड्युटी करुन गेले आहेत ते आज येणार नाहीत असे सांगुन भोसले पोलीस हे बारा एक वाजता येतील तेव्हा भोसले पोलीस यांची भेट घेण्यास सांगुन भोसले पोलीस याचा मोबाईल नबर दिला त्यानतर मी माझे मोबाईल क्रमांक 7218122696 वरुन भोसले पोलीस यांचे मोबाईल क्रमाक 9860400678 वर फोन करून जगताप पोलीस यांनी तुम्हाला भेटणेबाबत सांगितले आहे असे बोललो असता भोसले पोलीस यांनी मी बाहेर आहे असे सांगुन तु जगताप यानाच भेट असे सांगुन फोन कट केला त्यानतर मी परत गाझ्या मोबाईल क्रमांक वरुन जगताप पोलीस यांचे मोबाईल क्रमांकवर फोन करुन जगताप पोलीस याना सांगितले की, भोसले बाहेर आहेत त्यांनी तुमचीच भेट घेणेबाबत सांगितले आहे त्यावर जगताप पोलीस यांनी मला उदया 11/00 वाजता भेटण्यास बोलावले त्यानंतर मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो ती वेळ 12/03 वा ची होती.

त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी मला पुढील कारवाई बाबत विचारणा करता मी सांगितले की, 01 वाजता भोसले पोलीस यांची भेट घेतो व त्यांचेकडे लाच रक्कम देतो, त्यानंतर थडावेळ थांबुन पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी मला भोसले पोलीस यांचेकडे लाच रक्कम देणेसाठी सापळा कारवाई कामी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मी परीधान केलेल्या बऩियान चे आतील बाजुस लाऊन दिला पंच क्र.1 शिंदे याचेसह रवाना केले ती वेळ 13/17 वा ची होती त्यानंतर मी पंच क्र 1 शिंदे याचेसह बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गेलो असता बाहेरील रोडवर फुटपाथचे बाजुला भोसले पोलीस हे त्यांची पांढऱ्या रंगाची स्विफ्ट गाडी मध्ये बसलेले होते. सदर गाडीपाशी मी पंच क्र.1 शिंदे याचेसह जाऊन भोसले यांची भेट घेतली सदर सभाषण दरम्यान भोसले पोलीस यांना "कस करायच? त्यांना काल बोललो ते पंधरा हजार म्हणत होते मी दहा हजारावर डन केलय असे बोललो असता "भोसले बोलते की, "तुम्ही आपलं, पस्तीसच चाळीस चाळीसच तीस अरे एकदा खाटकुन मिटवून टाकायच ना. मिटवुन टाकायचा विषय काय लय लेका तुझच चाललय. रात्री झालाय फोन, ते म्हणालेत त्याला सकाळी दहा वाजता बोलावलय करुन टाक मला म्हणालेत मला म्हणाले त्यो अस अस म्हणलाय मला. मग ठिक ये म्हणलं. पण आता तु मला सांग ते घरी गेले अन तु आला आता मी काय करु. मस मी घेणार पण नावाने त्याच्या घ्याव लागणार कारण सही त्याची हे. नोंदी घ्याव्या लागत्यात. मी तुला सगळ सांगतो तु विषय काय हे धड तु पैसे बी घेउन येत नहाय... आज देतो तिन हजार उदया देतो बाकीचे नंतर. "असे बोलले. त्यावर मी "मग कशाचे? असे बोललो असता भोसले बोलले की, तुला अटक न करावसाठी अटक कराय नायतर बस जेलमधी आम्हाला काय.. होत.." सदरचे संभाषण पंच शिदे यांनी ऐकले आहे सदरवेळी भोसले यांना लाच रक्कम न देता मी व पंच क्र.1 शिंदे परत आलो. ती वेळ 14/10 वा ची होती सदर वेळी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना मी सांगितले की, मी लाच रक्कम घेऊन आलो आहे हे भोसले पोलीस यांना सांगणे माझ्या लक्षात राहीले नाही व लाच रक्कम दयायला सुचले नाही म्हणुन माझेकडील लाच रक्कम भोसले पोलीस यांना न देता मी व पंच परत आलो.

त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी मला पुढील कारवाई बाबत विचारणा करता भोसले पोलीस यांनी मला उदया 11/00 वाजता बोलावले असुन मी उदया दि. 26/3/2025 रोजी भोसले पोलीस व जगताप पोलीस यांना भेटणेसाठी जातो आज दि.25/3/2025 रोजीची सापळा कारवाई थांबवा अशी विनंती केलेने दि.

25/3/2025 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दि.26/3/2025 रोजी सापळा कारवाई करणेकामी मी लाच रकमेसह हजर झालो त्यानंतर माझे व पंच क्र. 1 श्री. शिंदे यांचे सापळा निवेदन ध्वनिमुद्रीत केले ती वेळ दुपारी 12/24 वा ची होती. त्यानंतर पोलीस निरीक्षक यांनी सुचनांची उजळणी करुन व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो माझे शर्टचे आतील बनियानला कोणासही दिसणार नाही अशा स्थितीत लावुन दिला ती वेळ 12/35 वा.ची होती त्यानंतर मी व पंच1 बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गेलो असता सदर विकाणी जगताप पोलीस उपस्थित नव्हते. त्यावेळी मी माझ्या मोबाईल क्रमांक 7218122696 वरुन जगताप पोलीस यांचे मोबाईल क्रमांक 9552594260 वर फोन केला असता जगताप पोलीस यांचा फोन बंद होता त्यानंतर मी माझे मोबाईल क्रमांक वरुन भोसले पोलीस यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 9860400678 वर फोन केला असता त्यांचेशी संपर्क झाला नाही त्यानंतर मी परत आली ती वेळ 13/36 वा ची होती त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी पुढील कारवाई बाबत मला विचारले असता मी आपणास संपर्क करेण त्यावेळी आपण पुढील कारवाई करु दि.26/3/2025 रोजीची कारवाई थांबवावी अशी विनंती केलेने दि. 26/3/2025 रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे त्यानंतर मी वैयक्तिक कारणास्तव पुढील कारवाई कामी उपस्थित राहीलो नाही.

दि.1/4/2025 रोजी पुढील कारवाई करणेबाबत मी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना संपर्क केलेने सापळा पथक येऊन सापळा कारवाई आयोजीत केली. त्यावेळी मी लाच रक्कम पोलीस निरीक्षक निबाळकर यांचेकडे हजर केली मी हजर केलेल्या सदर अन्थ्रासीन पावडर लावलेल्या नोटा मपोहवा गोरे यांनी माझे नेसत्या पॅटचे पुढील उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या व पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी योग्य त्या सुचना दिल्या त्यानंतर माझे व पच क्र.1 श्री शिंदे यांचे सापळा निवेदन ध्वनिमुद्रीत केले ती वेळ दुपारी 14/51 वा ची होती त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तो माझे शर्टचे आतील बनियानला कोणासही दिसणार नाही अशा स्थितीत लावुन दिला ती वेळ 15/05 वा.ची होती त्यानंतर मी लाच रक्कम घेऊन पंच 1 शिंदे यांचेसह बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गेलो असता सदर ठिकाणी जगताप पोलीस उपस्थित नव्हते त्यावेळी मी माझ्या मोबाईल क्रमाक 7218122696 वरुन जगताप पोलीस याचे मोबाईल क्रमाक 9552594260 वर फोन करुन पोलीस स्टेशनला आहेत का? असे विचारले असता जगताप यानी पोलीस स्टेशनला नसलेचे सांगुन दोन दिवसानी तुला फोन करतो असे सांगितले त्यानंतर मी परत आलो ती वेळ 15/38 वा ची होती त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यानी पुढील कारवाई बाबत मला विचारले असता जगताप पोलीस 2 दिवसांनी फोन करणार आहेत त्यावेळी मी आपणास संपर्क करेन त्यावेळी आपण पुढील कारवाई करु व आज दि.01/04/2025 रोजीची कारवाई थांबवावी अशी विनंती केलेने दि. 01/04/2025 रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि. 28/4/2025 रोजी मी लाचलुचपत कार्यालयात हजर राहीलो. त्यावेळी मला पुढील सापळा कारवाईबाबत विचारणा करता मी सांगितले की, दरम्यानचे कालावधी मध्ये मी बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गेलो असता दि.24/4/2025 रोजी मला माझी गाडी परत मिळालेली आहे. सदर बाबत मी ला.प्र.वि पथकास कळविली नाही. माझेकडे लाच मागणी करणाऱ्या पोलीस यांचे नाव श्री सुनिल माणिक जगताप, सहायक पोलीस उप निरीक्षक असे असुन दुसरे व्यक्ती भोसले हे पोलीस नसुन खाजगी इसम असल्याचे व त्यांचे नाव प्रविण भाऊसाहेब भोसले असल्याचे मला समजले आहे. त्यानंतर अदयापपर्यंत जगताप पोलीस व भोसले (खाजगी इसम) यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेबाबत मला संपर्क साधला नाही. त्यामुळे ते माझे कडुन लाच रक्कम स्विकारतील असे मला वाटत नाही.

तरी माझ्या दिनांक 18/3/2025 रोजीच्या तक्रारीचे अनुषंगाने दि.18/3/2025, दि 19/03/2025, दि 20/03/2025, दि.24/03/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये माझे विरुध्द अपघाताचा गुन्हा दाखल न करणेसाठी सदर गुन्हयात मला अटक न करणेसाठी व गाडी सोडवणेसाठी म्हणुन बारामती तालुका पोलीस ठाणे येथील जगताप पोलीस व भोसले यांनी माझेकडे सुरवातीला 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन पडताळणी दरम्यान सुनिल माणिक जगताप, सहायक पोलीस उप निरीक्षक, बारामती तालुका पोलीस स्टेशन यांनी 15,000/- रु. लाच मागणी करुन तडजोडीअंती 10,000/- रुपये लाच मागणी करुन लाच स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले. सदर लाच मागणीस प्रविण भाऊसाहेब भोसले खाजगी इसम यांनी पैसे देणेसाठी अपप्रेरणा देऊन प्रोत्साहन दिले म्हणून त्या दोघांवर कारवाई होणेस विनंती आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला....

(प्रविण निंबाळकर) 9552574140
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
vaishali raosaheb patil(I (Inspector)) /

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **No.**(क्र.): **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
पोलीस ठाणे अंमलदार
बारामती तालुका पोलीस ठाणे

**Name** (नाव): vaishali raosaheb patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):